# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे

**वाचले :** १) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ कलम २५, ३० (२) (३) (५) व (१८)
२) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र. १९९/एस.डी.२, दिनांक ०२/०८/२०१९
३) भारतीय हवामान विभाग, मुंबई यांचेकडील दिनांक १९/०८/२०२५ रोजीची हवामान विषयक पूर्वसूचना
४) या कार्यालयाची मंजूर टिपणी दि.१९/०८/२०२५

क्रमांक/सामान्य/कक्ष-४/टे-१/अतिवृष्टी आदेश/कावि- २०६५/२०२५ दि.१९/०८/२०२५

**आदेश**

**ज्याअर्थी,** उक्त नमुद अ. क्र. २ अन्वये प्रादेशिक हवामान विभागाच्या पूर्वसूचनेवरून जिल्ह्यातील त्या-त्या भागातील स्थानिक परिस्थितीचा आढावा घेवून, संपूर्ण जिल्ह्याकरीता अथवा जिल्ह्यातील ठराविक स्थानिक क्षेत्रातील शाळांना सुट्टी जाहिर करण्याचे जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी म्हणून अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

**ज्याअर्थी,** आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हाधिकारी हे आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत व संदर्भ क्र. २ कडील शासन परिपत्रकानुसार शाळांना सुट्टी जाहिर करण्याचे अधिकार संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

**आणि ज्याअर्थी,** हवामान विभागाने दिलेल्या पुर्वसुचनेनुसार ठाणे जिल्हयात उद्या दिनांक २०/०८/२०२५ रोजी ऑरेंज अलर्ट देण्यात आलेला आहे व ठाणे जिल्हयात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. तसेच ठाणे जिल्हयातील अनेक भागात मुसळधार पाऊस सुरु असल्याने तसेच अंबरनाथ तालुक्यातील उल्हास (जांभूळपाडा) नदीने धोका पातळी ओलांडली आहे, जिल्हयातील बारवी, तानसा हे धरणे १००% क्षमतेने भरलेले असल्याने धरणाचे दरवाचे उघडलेले असून पाण्याचा विसर्ग सुरु आहे. तसेच उद्या दिनांक २०/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०९ वाजता ३.९७ मी इतक्या उंचीची समुद्रास भरती येणार आहे याबाबींचा विचार करता ठाणे जिल्हयात अनेक भागात पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्याअनुषंगाने ठाणे जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये तसेच अतिवष्टीमुळे आपत्तकालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा परिणाम शालेय विद्यार्थ्यांवर होऊ नये या करिता जिल्हयातील सर्व शाळा व महाविद्यालये (अंगणवाडी पुर्व प्राथमिक व प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालय) विद्यार्थ्यांना उद्या दिनांक २०/०८/२०२५ रोजी सुट्टी असणे आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, ठाणे यांचे मान्यतेने ठाणे जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी, सरकारी व खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळा, जिल्हा परिषद शाळा, नगरपालिका शाळा, अनुदानित व विनाअनुदानित शाळा, सर्व आश्रमशाळा, सर्व महाविद्यालये तसेच आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षक केंद्र यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था यांना उद्या दिनांक २०/०८/२०२५ रोजी सुट्टी जाहीर करण्यात येत आहे.

मा. जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने.

**(डॉ. संदिप माने)**
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण ठाणे**

प्रत :-
१. मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.